IIPIMRJ
IIP
International Multidisciplinary Research Journal

**An Online Peer-Reviewed / Refereed Journal**
Vol: 03 No. Issue I, (January-March) (2026)
Impact Factor: GSRD-IF: 5.001
ISSN: 3049-2734 (Online)

# सोशल मीडियातील मराठी भाषा

**स्वाती संभाजी शिंदे**
संशोधक विद्यार्थी, कोल्हापूर

**Article Info**

***Article History:***
Received: 24th January 2026
Accepted: 01st February 2026
Published: 05th February 2026

***Keywords:***

*सोशल मीडिया*

**ABSTRACT**

सध्याच्या युगामध्ये सोशल मीडियाचा वापर हा अतिशय महत्वाचा मानला जातो. ज्याप्रमाणे अन्न, वस्त्र आणि निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा मानल्या जातात त्याप्रमाणे सोशल मीडिया ही पण एक महत्वाची गरज मानवाच्या दैनंदिन जीवनात मानली जाते. सकाळी उठल्यापासून, रात्री झोपेपर्यंत आपण सोशल मीडियाच्या संपर्कात असतो यामध्ये विविध प्रकारची प्रसारमाध्यमे येतात यामध्ये वर्तमानपत्रे, साप्ताहिक, मासिके, विविध पत्रके, नियतकालिके यांचा मुद्रित प्रसारमाध्यमांमध्ये समावेश होतो. मुद्रण कलेच्या विकासामुळे होर्डिंग्ज, मोबाईल किंवा भ्रमणध्वनीच्या माध्यमातून इंटरनेटचा वापर करून फेसबुक, व्हॉट्सअॅप, ट्विटर, ब्लॉग, हाइक यांसारख्या सोशल मीडिया वापर केला जातो. यामधून शुभेच्छा, विविध जाहिराती, संदेश देण्याचे कार्य केले जाते. सोबतच स्वमतप्रतिपादनाचे प्रभावी व्यासपीठ म्हणूनही कार्यरत असते. सोशल मीडियाचा झालेला विकास आपणास स्पष्ट करणार आहे सध्या मराठी भाषेचा वापरही सोशलमीडियावर केला जातो.

***Plagiarism Check Report:***
Tool Used: Turnitin
Date of Report: February 02, 2026
Similarity Index: 3%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2026 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Shinde, S. S. (2026). सोशल मीडियातील मराठी भाषा. *IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS)*, 2(I), 1041–1045.

**प्रस्तावना –**

भाषा म्हणजे विचारांना आणि भावनांना व्यक्त करण्याचे साधन भाषेच्या माध्यमातून लोक बोलून लिहून, वाचून, हावभाव करून म्हणजे आपले विचार आणि भावना व्यक्त करताना भाषा ही संस्कृत भाषेतील "भाष" या धातूपासून आली आहे 'भाष' याचा अर्थ सांगणे किंवा प्रकट करणे असा होतो.

लहानपणापासून आपण आपली मातृभाषा बोलू लागतो, ती आपण कुटुंबातील व्यक्ती सभोवतालच्या व्यक्तीच्या संपर्कातून शिकतो पुढे जाऊन आणखी त्यात एक-दोन भाषांची भर पडते पुढे शाळा-कॉलेजात शिकत असताना भाषेच अधिकृत आणि सखोल शिक्षण मिळत काहीजण त्यापलीकडे जाऊन देशी - परदेशी भाषा शिकतात. प्राणी आणि मानव, समूह करून त्यावेळी एखादी गोष्ट समोरच्या पर्यंत पोहचविण्यासाठी, परस्परांशी संपर्क साधण्यासाठी जे माध्यम वापरतात ते माध्यम म्हणजे भाषा होय. त्यात अगदी हावभाव, ध्वनी, कृती या सर्वांचा समावेश होतो प्राण्यांच्या ध्वनींचे अनुकरण भ्रमणध्वनीतर्फे काढलेले सूर यातून भाषा निर्माण झाली असे काही तज्ञांचे मत आहे पण भाषिक संकेत व आशय ध्वनी व अर्थ, यांचा त्यातून खुलासा मिळत नाही. काहीजणांनी लहान मुलांच्या भाषा आत्मसात करण्याच्या प्रक्रियेचा आधार घेतला पण आजच मुलं मूलतः भाषिक सामाजिक वातावरणात वाढत असल्यामुळे ते भाषा निर्माण करत नाही, मुक्त असलेली परंपरागत भाषा निरीक्षण, अनुकरण, प्रयत्नपूर्वक पद्धतीने स्वतःच शिकत सर्व भाषांच एक एकच असावं असं मानून त्या दिशेने संशोधन करण्याचा प्रयत्न अभ्यासकांनी केला आहे.

भाषा शिकवण्याच्या तंत्रात गेल्या काही काळात सतत बदल होत राहिला आहे. पूर्वी व्याकरण व कोश यांचा उपयोग करून पाठांतर करणे, गणिताप्रमाणे रूपांतरित पाठ करणे, भाषांतराची उदाहरणे सोडवून हे केले जाई. पुढे यांत्रिक साधन उपलब्ध झाली. ध्वनिमुद्रिकेमुळे एकच धडा पुन: पुन्हा ऐकून उच्चारात अनुकरण अधिकाधिक नेमके होत लागले. ध्वनिफीती, ध्वनिशाका इ. आधुनिक साधनांचा प्रसार झाला.

मराठी भाषा ही इंडो-युरोपीय भाषाकुळातील एक भाषा आहे. मराठी भाषा भारताच्या प्राचीन भाषांपैकी एक असून महाराष्ट्री प्राकृतचे आधुनिक रूप आहे. मराठीचे वय सुमारे 2400 वर्ष असून महाराष्ट्र हे मराठी भाषिकांचे राज्य म्हणून मराठी भाषेला वेगळे महत्त्व प्राप्त झालेले आहे. मराठी ही भारताच्या 22 अधिकृत भाषांपैकी एक आहे. मराठी ही महाराष्ट्र राज्याची अधिकृत तर गोवा राज्याची सहअधिकृत भाषा आहे. 2011 च्या जनगणनेनुसार भारतात मराठी भाषकांची एकूण लोकसंख्या सुमारे 14 कोटी आहे मराठी मातृभाषा असणाऱ्या लोकांच्या संख्येनुसार मराठी ही जगातील दहावी व भारतातील तिसरी भाषा आहे. आजतागायत मराठी भाषेतून अनेक श्रेष्ठ साहित्यकृती निर्माण झालेल्या आहेत आणि त्यात सातत्यपूर्ण रीतीने भर पडत आहे.

जगातील बहुतेक प्रमुख भाषांप्रमाणे मराठी भाषाही एकाहून अधिक पद्धतींनी बोलली जाते मुख्य भाषेशी नाते कायम ठेवलेली, तिची पोशाखाप दर 12 कोसांनंतर उच्चारात, शब्दसंग्रहात, आशयात व वाक्यप्रचारात बदलत राहते. पिढ्या न पिढ्या विशिष्ट राज्यात स्थायिक झाल्यामुळे मराठी भाषकांच्या मूळ मराठी बोलीवर त्या राज्याच्या स्थानिक भाषेचा ठसा स्पष्टपणे उमटलेला दिसतो.

त्यासुसार तिचे स्थानमाहात्म्यानुसार मराठी बोलीचे कोकणी, मराठी, कोल्हापुरी मराठी, कारवारी मराठी, अहिराणी, मराठवाडी, नागपुरी असे अनेकविध प्रकार पडतात. भौगोलिक परिसरानुसार कोल्हापुरी, चंदवडी, नागपुरी, संगमेश्वरी, मराठवाडी, कोकणी, वऱ्हाडी, मालवणी, नंदुरबारी, तंजावर, नांदेडी, बागलाणी खाल्यानी , वऱ्हाांची

तासंगी, डोंगरांगी, जामनेरी, खानदेशी असे बोलीचे उपप्रकार होतात.

**सोशल मीडिया आणि मराठी भाषा -**

सोशल मीडियावर मराठी भाषेचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. विशेषतः सोशल मीडियावर व्यक्त होताना मराठी भाषेचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात आहे. मराठीतून स्टेटस अपडेट करण्यापासून ते संदेश पाठवण्यापर्यंत मराठी भाषा पसंत केली जात आहे. यामुळे गेल्या दोन वर्षात मराठीतून पोस्ट करण्याच्या प्रमाणात तब्बल 800 टक्क्यांनी वाढ झाली. आहे गुगलने प्रसिद्ध केलेल्या एका अहवालानुसार देशात 50 कोटी इंटरनेट युजर्स आहेत. त्यामध्ये अँड्रॉइड युजर्सकडून वापरल्या जाणाऱ्या भाषेसंदर्भात विश्लेषण करण्यात आले. त्यात 73 टक्के युजर्स त्यांच्या स्थानिक भाषेतून ऑनलाईन डेटा सर्च करतात हे समोर आले असून त्यामध्ये मराठी आणि बंगाली भाषेचा वापर सर्वाधिक होत असल्याचे दिसून आले आहे. प्रादेशिक भाषात, इंटरनेट वापराच्या देशातील शहरी भागाच्या तुलनेत (6.6%) ग्रामीण भागाने आघाडी घेतली (76%) आहे. डिजिटल प्लॅटफॉर्मवरील मराठीचा वाढत वापर ही बाब स्वागतार्ह वाटली जात आहे असे असले तरी सोशल मीडियावरील मराठीचा हा वापर मराठी भाषेच्या संवर्धनासाठी पुरेसा नसल्याचे मत मराठी अभ्यासकांनी प्रा. दीपक पवार यांनी व्यक्त केले. सोशल मीडियावर मराठीचा वापर जास्तीत जास्त वाढवण्यासाठी होत आहे इतकेच नव्हे तर फॉरवर्डही मोठ्या प्रमाणावर होत आहेत. हे सर्व होत असताना नवीन मराठी मजकूर तयार होणे किंवा भाषा संवर्धनासाठी आवश्यक असलेल्या गोष्टी यातून होत नाही, अशी खंतही त्यांनी व्यक्त केली. यासाठी सदैव मराठीचा आग्रह धरणे आवश्यक आहे.

**असा होतो मराठीचा वापर –**

ई-मेल - 16 टक्के

सोशल मीडिया – 79 टक्के

सर्च इंजिन – 43 टक्के

ब्लॉग - 23 टक्के

**सोशल मीडियाचे फायदे –**

1. सोशल मीडिया लोकांना समर्थन आणि प्रोत्साहन शोधण्यात मदत करू शकतो.
2. सोशल मीडिया लोकांना नवीन गोष्टी शिकण्यात मदत करू शकतो.
3. सोशल मीडिया लोकांना अधिक सर्जनशील होण्यास मदत करू शकतो.

स्वतःला शिक्षित बनवण्यासाठी आणि नव नवीन गोष्टी शिकण्यासाठी सोशल मीडियाचा वापर केला जातो.

**तोटे –**

1. सोशल मीडियाच्या अतिवापरामुळे लोकांमध्ये भावनिक संपर्काचा अभाव आहे.
2. आजच्या जगात सोशल मीडियामुळे Face to face संवाद कौशल्य कमी होत आहे.
3. कधीकधी सोशल मीडिया हे विद्यार्थी जीवनात विचलित होण्याचे कारण बनते.
4. अतिवापरामुळे अनेकजण कुटुंबापासून दूर जातात.

**सोशल मीडिया माध्यमे –**

(1) फेसबुक :

फेसबुक ही सोशल मीडियातील एक लोकप्रिय साइट आहे. फेसबुकची सुरुवात मार्क झुकरबर्गने केली आहे. मार्क झुकरबर्ग हा फेसबुकचा C.E.O. मानला जातो. फेसबुकमुळे आपण आपल्या मित्रपरिवाराबरोबर एकत्र राहू शकतो, बोलू शकतो. देश-परदेशातील अनेक व्यक्ती फेसबुक पेज उघडले की फोटोच्या माध्यमातून नजरसमोर येत असतात.

(2) युट्यूब :

you Tube ही एक सोशल मीडिया साइट आहे. हे एक जागतिक व्हिडिओ शेअरिंग प्लॅटफॉर्म आहे. 14 फेब्रुवारी 2005 रोजी स्टीव्ह चेन, चॅड हर्ले आणि जावेद करीम यांनी हे लॉन्च केले होते. नील मोहन यांना युट्यूबचे सीईओ म्हटले जाते. You tube वरून लोकांना विविध प्रकारची माहिती व्हिडिओच्या स्वरूपात समजु शकते. लहान मुले You tube वर मनोरंजनाचे व्हिडिओ पाहतात.

(3) व्हॉट्सअ‍ॅप :

व्हॉट्सअ‍ॅपची निर्मिती 2009 साली ब्रायन अ‍ॅक्टन व जॅन कोम ह्या दोन अमेरिकन व्यक्तींनी केली. ही एक लोकप्रिय संदेश प्रणाली आहे. हिच्यामार्फत लोक इंटरनेट वापरून एकमेकांशी चर्चा करतात, संदेश पाठवतात व वाचतात हे संदेश पाठविण्यासाठी मराठी भाषेचा वापर करता येतो. संदेशांसोबत चित्रे, गाणी, व्हिडिओ व विविध प्रकारच्या फाइल्स देखील एकमेकांसोबत सामायिक करता येतात आयफोन अँड्रॉइड, विंडोज फोन इत्यादी सर्व आधुनिक स्मार्टफोनवर उपलब्ध असून सप्टेंबर 2015 मध्ये जगभर व्हॉट्सअ‍ॅपचे 90 कोटी वापरकर्ते झाले आहेत. मार्क झुकरबर्ग हे सध्या व्हॉट्सअ‍ॅप या कंपनीचे मालक आहेत.

(4) इंस्टाग्राम :

इंस्टाग्रामवर व्हिडिओ, फोटो, पोस्ट शेअर करता येतात. इंस्टाग्रामवर अनेक लोक connected असतात त्यांना followers असे म्हटले जाते. इंस्टाग्रामवर लोक फोटो, व्हिडिओ टाकतात. त्याला पोस्ट म्हणतात ती पोस्ट आपण लाईक, कमेंट आणि शेअर देखील करू शकतो. आजच्या काळामध्ये लोक इंस्टाग्राम खूप मोठ्या प्रमाणात वापरत आहेत.

(5) वीचॅट :

वीचॅट ही सोशल मीडिया साइट आहे हे एक मेसेजिंग साइट प्लॅटफॉर्म आहे हे होल्ड - टू - टॉक व्हॉइस मेसेजिंग, ब्रॉडकास्ट मेसेजिंग आहे, व्हिडिओ कॉन्फरन्सिंग हे व्हिडिओ गेमसाठी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म आहे.

(6) टिकटॉक :

हे एक मोबाइल यूजर प्लॅटफॉर्म आहे वापरकर्त्यांसाठी लहान व्हिडिओ बनविण्यासाठी उपयुक्त आहे. याच्या मदतीने यूजर्स 15 सेकंदाचा व्हिडिओ बनवू शकतात आणि share करू शकतात. हे लोकांशी जोडण्यास मदत करते.

(7) फेसबुक मेसेंजर :

संदेश पाठवण्यासाठी आणि फोटो, व्हिडिओ, स्टिकर्स, ऑडिओ आणि फाइल्स शेअर करण्यासाठी Facebook मेसेंजर

चा वापर करतात.

(8) डौबिन :

टिकटॉक प्रमाणे याचा वापर केला जातो. व्हिडिओ शेअरिंग साठी उपयुक्त प्लॅटफॉर्म आहे.

(9) स्नॅपचॅट :

स्नॅपचॅट 2011 मध्ये सुरू झाले. याचा वापर अधिकतर तरुण करतात हे एक मेसेजिंग प्लॅटफॉर्म आहे. जे वापरकर्त्यांचे फोटो आणि व्हिडिओ काढण्यासाठी मदत करते त्याला Shaps म्हणतात.

(10) टेलिग्राम :

टेलिग्रामची सुरुवात 2013 मध्ये झाली. भारतात टेलिग्रामचे सर्वाधिक वापरकर्ते आहेत.

**निष्कर्ष** –

1. बदलत्या काळाची गरज ओळखून संपूर्ण विश्वाला मराठी भाषेचा व साहित्याचा परिचय करून देण्याचे कार्य सोशल मीडिया च्या माध्यमातून केले जात आहे.
2. ईमेल, एसएमएस, ब्लॉग, फेसबुक, ट्विटर, इंटरनेटवरील विविध साइट वापरून रोजची कामे करता येतात.
3. सोशलमीडियाच्या वापरामुळे मराठी भाषेतील साहित्य-संस्कृती व कलेची ओळख संपूर्ण जगाला करून दिली.

**संदर्भसूची** –

1. आपटे मोहन, संगणक व इंटरनेट, राजहंस प्रकाशन, पुणे.
2. मराठी संकेतस्थळे विकिपीडिया (mr.m.wikipedia)
3. नासिरावाकर ल. रा. 'व्यवहार उपयोगी मराठी' फडके प्रकाशन, कोल्हापूर.
4. शिवम संशोधन पत्रिका वर्ष नववे : अंक चौविसावा | ऑक्टो-नोव्हें-डिसेंबर 2020.